(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**प्रकाशनयोग्य**

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

**दिवाणी अपिल अधिकारिता**

**दिवाणी अपिल क्र. ९६६/२०२३**

**(वि . अ. या. (दि.) क्र. ५६२३/२०२२ मधून उद्भवलेले)**

**राष्ट्रीय वैद्यकीय आयोग आणि इतर. ... अपीलकर्ते**

**विरुद्ध**

**अण्णासाहेब चुडामण पाटील**
**मेमोरियल वैद्यकीय महाविद्यालय आणि इतर. ... उत्तरवादी**

## सोबत

**दिवाणी अपिल क्र. ९६७/२०२३**

**(वि . अ. या. (दि.) क्र. ६३४५/२०२२ मधून उद्भवलेले)**

## न्यायनिर्णय

**डॉ. धनंजय य. चंद्रचूड, भारताचे मुख्य न्यायमूर्ती**

१. अनुमती दिली.

२. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील दोन न्यायाधीशांच्या

खंडपीठाने ४ मार्च २०२२, रोजी दिलेल्या न्यायनिर्णयातून हे अपील उद्भवले आहे.

३. अण्णासाहेब चुडामण पाटील मेमोरियल मेडिकल महाविद्यालयाची[1] स्थापना १९९० या वर्षी एमबीबीएस पदवी अभ्यासक्रमासाठी वार्षिक १०० जागांची प्रवेश क्षमता असलेले महाविद्यालय म्हणून झाली. ज्या विद्यापीठाशी वैद्यकीय महाविद्यालय संलग्न होते, त्या विद्यापीठाने दिलेली एमबीबीएसच्या पदवी १०० जागांसाठी भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ च्या कलम ११ अन्वये १९९७ मध्ये मान्यता दिली होती. या मान्यतेचे दर पाच वर्षांनी नूतनीकरण करणे बंधनकारक होते. २०१७-१८ आणि २०१८-१९ या शैक्षणिक वर्षांसाठी वैद्यकीय महाविद्यालयाला विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची परवानगी देण्यात आली नव्हती. वैद्यकीय महाविद्यालयाने, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून, प्रवेश क्षमता १०० जागांवरून १५० जागांपर्यंत वाढ करण्यासाठी ३० नोव्हेंबर २०२० रोजी अर्ज सादर केला. त्याचवेळी, २०२१ मध्ये मान्यतेचे नूतनीकरण होणार होते. कोविड-१९ साथीच्या काळात, अपीलकर्त्यांकडून कोणतीही तपासणी केली जाऊ शकली नाही. १० मे २०२१ रोजी वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने प्रतिज्ञापत्र दाखल करून कोणतीही कमतरता नसल्याचे नमूद करण्यात आले होते. पहिल्या अपीलकर्त्याच्या पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण मंडळाने, कोविड-१९ साथीच्या आजाराची सुरुवात

[1] "वैद्यकीय महाविद्यालय"

लक्षात घेऊन १५ जुलै २०२१ रोजी शैक्षणिक सत्र २०१६-१७ साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी मान्यतेचे नूतनीकरण मंजूर केले. ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी असून, कायद्यानुसार मान्यता कायम ठेवण्याच्या अटीवर ही मान्यता देण्यात आली होती. वैद्यकीय महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जावर प्रक्रिया करण्यात आली आणि ८/९ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रवेश क्षमता १०० वरून १५० पर्यंत वाढवण्यासाठी प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. १६ नोव्हेंबर २०२१ रोजी वैद्यकीय महाविद्यालयाने स्वीकृती पत्रासह आवश्यक हमीपत्र आणि कागदपत्रे सादर केल्याच्या अधीन, प्रवेश क्षमतेत वाढ मंजूर करण्यासाठी उद्देश पत्र जारी केले गेले. २३ नोव्हेंबर २०२१ रोजी वैद्यकीय महाविद्यालयाने आवश्यक कागदपत्रे/ हमीपत्र, स्वीकृती पत्रासह सादर केले. २५ नोव्हेंबर २०२१ रोजी, वैद्यकीय महाविद्यालयाने, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ साठी, एमबीबीएस ची प्रवेश क्षमता १०० जागेवरून १५० जागा करण्यासाठी जो अर्ज केला होता, त्याबाबत परवानगी पात्र जरी करण्यात आले ज्याद्वारे, सदरचा अर्ज मंजूर करण्यात आला. अचानक तपासणी दरम्यान, वैद्यकीय महाविद्यालय किमान मानके पाळत नसल्याचे आढळल्यास, परवानगीचे पत्र मागे घेण्यात येईल या विशिष्ट अटीच्या अधीन राहून, सदरची मंजुरी देण्यात आली होती.

४. दरम्यान, वैद्यकीय महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये अनियमितता

आणि त्रुटी असल्याच्या काही तक्रारी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. १४/१५ जानेवारी २०२२ रोजी अचानक प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी निरीक्षकांचे पथक नेमण्यात आले होते. तपासणीदरम्यान, मूल्यांकन कर्त्यांना प्राध्यापक, रहिवास आणि चिकित्सालयीन सामग्री सह इतर बाबींची तीव्र कमतरता आढळली. मूल्यांकनकर्त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर १९ जानेवारी २०२२ रोजी वैद्यकीय महाविद्यालयाला पत्र पाठवून प्रवेश क्षमता १०० वरून १५० जागा वाढविण्याच्या परवानगीचे पत्र मागे घेण्यात आले आणि अचानक तपासणीदरम्यान आढळलेल्या गंभीर त्रुटी लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे प्रवेश थांबविण्याचे निर्देश देण्यात आले.

५. वैद्यकीय महाविद्यालयाने घटनेच्या अनुच्छेद २२६ अन्वये मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली. याचिकाकर्त्यांना ३० जानेवारी २०२२ पर्यंत वैद्यकीय महाविद्यालयाची तपासणी करण्याचे आदेश देऊन याचिका निकाली काढण्यात आली आणि ३ फेब्रुवारी २०२२ पर्यंत अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे याचिकाकर्त्यांनी प्रतिप्रतिज्ञापत्र दाखल न करता, सुनावणीच्या पहिल्या तारखेला २५ जानेवारी २०२२ रोजी, याचिका निकाली काढण्यात आली. यामुळे २९ जानेवारी २०२२ रोजी, विशेष अनुमती

याचिका[2] दाखल करण्यात आली. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या आदेशात बदल करण्याचा अर्ज वैद्यकीय महाविद्यालयाकडून दाखल करण्यात आला होता. उच्च न्यायालयाने आपल्या न्यायनिर्णयात बदल करण्यास नकार दिल्याने वैद्यकीय महाविद्यालयाने या न्यायालयासमोर विशेष अनुमती याचिका[3] दाखल केली होती. १४ फेब्रुवारी २०२२ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाद्वारे, या न्यायालयाने २५ जानेवारी २०२२ आणि २ फेब्रुवारी २०२२ रोजीचे न्यायनिर्णय रद्द केले आणि रिट याचिका उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यासाठी पुनर्संचयित केली. त्यानंतर अपीलकर्त्यांच्या वतीने प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले. खंडपीठाने ४ मार्च २०२२ च्या निर्णयाद्वारे रिट याचिका अंशत: मान्य केली. एमबीबीएसच्या ५० जागांच्या परवानगीचे पत्र मागे घेण्यात आले, हा याचिकाकर्त्यांचा १९ जानेवारी २०२२ रोजीचा आदेश उच्च न्यायालयाने कायम ठेवला. मात्र, मान्यता मागे घेण्यासाठी याचिकाकर्त्यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने २०२१-२२ साठी एमबीबीएसच्या १०० जागांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा अधिकार वैद्यकीय महाविद्यालयाला आहे, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणात, न्यायालयाने कामकाज सूरु केले तेव्हा ८ एप्रिल २०२२ रोजी नोटीस बजावण्याचा आदेश देण्यात आला. या न्यायालयाने वस्तुस्थिती स्पष्ट केली की उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर १५ जुलै

[2]एसएलपी (सी) क्र. ११७०/२०२२
[3]एसएलपी (सी) क्र.२२३४-२२३५/२०२२

२०२१ रोजी देण्यात आलेली मान्यता आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याची आणि/किंवा चालविण्याची परवानगी का मागे घेण्यात येऊ नये, याची नोटीस वैद्यकीय महाविद्यालयाला ७ मार्च २०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. दरम्यान, १४/१५ जानेवारी २०२२ रोजी करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान लक्षात आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने वैद्यकीय महाविद्यालयाला प्रवेश थांबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. या न्यायालयाने परिच्छेद ३७ मध्ये समाविष्ट असलेल्या परिणामकारक निर्देशाच्या कारवाईला स्थगिती दिली.

वैद्यकीय महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी १०० एमबीबीएस विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची परवानगी देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद ३७ मधील परिणामकारक निर्देशांच्या अंमलबजावणीला या न्यायालयाने स्थगिती दिली. राष्ट्रीय वैद्यकीय परिषद आणि वैद्यकीय मूल्यनिर्धारण आणि रेटिंग बोर्ड यांना आवश्यक निकषांचे पालन करण्यात काही त्रुटी आहेत की नाही हे ठरविण्याच्या उद्देशाने, दोन महिन्यांच्या कालावधीत नव्याने तपासणी करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

६. या न्यायालयाच्या निर्देशानुसार २८/२९ एप्रिल २०२२ रोजी, २०२१-२२ साठी वैद्यकीय महाविद्यालयाची तपासणी करण्यात आली. तपासणी अहवाल लक्षात घेऊन याचिकाकर्त्यांनी वैद्यकीय महाविद्यालयाला १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची

परवानगी दिली आहे.

७. स्थगितीचा आदेश असूनही या न्यायालयासमोर जी स्थिती समोर आली आहे, ती अशी आहे की या न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशानंतर सुद्धा वैद्यकीय महाविद्यालयाने २०२१-२२ साठी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे सुरूच ठेवले. आदेशातील तफावत दूर करण्यासाठी किंवा १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची परवानगी मिळावी यासाठी या न्यायालयापुढे कोणताही अर्ज दाखल करण्यात आला नव्हता.

८. याचिकाकर्त्यांचे वकील गौरव शर्मा आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने वरिष्ठ वकील निधेश गुप्ता यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आहे.

९. अभिलेखावर ठेवण्यात आलेल्या सामग्रीवरून असे दिसून येते की सुरुवातीला केलेल्या तपासणीदरम्यान गंभीर त्रुटी आढळल्या, परिणामी अपीलकर्त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी परवानगी काढून घेतली.

१०. या टप्प्यावर, उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा परिच्छेद ३४ वगळता, जे विनिर्दिष्ट त्रुटी आढळल्या आहेत, त्याची तपशीलवार उजळणी करण्याची आवश्यकता असू शकत नाही, ज्याचा उल्लेख खाली केला आहे :-

> “I. दुपारी २ वाजेपर्यंत बाह्य रुग्ण केवळ २२ आणि आंतररुग्ण केवळ ३९ टक्के (बेड ऑक्युपेन्सी रेट)

असतात, दाखल झालेले रुग्णही निरोगी दिसतात आणि कोणतीही लक्षणीय चिकित्सालयीन लक्षणे नसताना बहुतांश रुग्णांना सायंकाळी ५ वाजेपर्यंत रुग्णालयातून बाहेर पाठविण्यात आले. शस्त्रक्रिया होत नाहीत आणि कोणतीही प्रसूती झाली नाही. मूल्यांकनाच्या दिवशी रुग्णालयात केवळ तीन एक्स-रे आणि दोन अल्ट्रासाऊंड करण्यात आले.

II. परिचारिकांच्या तक्त्यामध्ये १६.०१.२०२२ पर्यंत (१४.०१.२०२२ रोजी नोंदलेले) रूग्णांच्या जीवनावश्यक वस्तू आणि उपचाराच्या सूचना देखील होत्या.

III. १४.०१.२०२२ रोजी दाखल झालेले रुग्ण खरे नव्हते. ते निरोगी दिसत होते आणि त्यांनी टाळाटाळ करणारी उत्तरे दिली. अनेक रुग्णांचे केसेस रेकॉर्ड उपलब्ध नव्हते. उपलब्ध नोंदींमध्ये अनेक रुग्णांच्या केसचा इतिहास आणि उपचारांवर कोणत्याही डॉक्टर किंवा समुपदेशकाची स्वाक्षरी नव्हती. लक्षणांचे स्वरूप प्रवेशास पात्र वाटत नव्हते. गुडघेदुखीसाठी फिजिओथेरेपीसाठी अस्थिरोग कक्षामध्ये 'दाखल' होते. प्रकरणाच्या फायलींमध्ये मूलभूत आणि आवश्यक मापदंडांची नोंद केली गेली नाही आणि मूल्यांकनकर्त्यांना अभिलेखाच्या सत्यतेवर संशय आला. रुग्ण त्रस्त होते आणि फायलींमध्ये तापाची कोणतीही नोंद आढळली नाही. काही

फायलींमध्ये १६ जानेवारीपर्यंत तापमानाची आगाऊ नोंद करण्यात आली होती; तसेच दिलेले उपचारही १६ जानेवारीपर्यंत आगाऊ देण्यात आले.

IV. शस्त्रक्रिया कक्षामध्ये कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर डॉ. स्वाती पाटील यांच्याकडे बीएचएमएसची पदवी होती आणि त्या रुग्णालयाची नियमित कर्मचारी नव्हत्या.

V. बालरोग विभागात १३ रुग्ण दाखल होते त्यापैकी १० रुग्ण तपासणीच्या दिवशी म्हणजेच दि. १४.०१.२०२२ रोजी दाखल करण्यात आले होते. मूल्यांकनकर्त्यांचे मत आहे की मुले वरवर पाहता चांगली दिसत होती आणि दुपारचे जेवण घेत होती. नोंदवलेली लक्षणे नोंदीशी जुळत नव्हती. केस फाइल्समध्ये आयव्ही द्रव पदार्थ आणि औषधे दिल्याची नोंद असूनही त्यांना औषधे दिली गेली नाहीत, असे या मुलांचे म्हणणे आहे. पाच वाजता मूल्यांकनकर्त्यांनी या वॉर्डची फेरपाहणी केली असता १४.०१.२०२२ रोजी दाखल झालेले जवळपास सर्व रुग्ण कक्षात आढळले नाहीत. सायंकाळी ५.०० वाजता अस्थिरोग विभागात फिजिओथेरपीसाठी सकाळी दाखल झालेला एकही रुग्ण नव्हता.

VI. वैद्यकीय, शल्यचिकित्सा, बालरोग आणि अस्थिरोग कक्षाच्या प्रगणनेच्या अहवालांमध्ये आणखी गंभीर त्रुटी होत्या. दैनंदिन प्रगणना अहवालामध्ये पेन्सिल

> वापरून नोंदी केल्या होत्या. गेल्या पाच दिवसांतील प्रसूती व स्त्रीरोग वॉर्डच्या प्रगणनेच्या अहवालात, तीन ते तेरा या दरम्यानचे नवीन प्रवेश होते. तथापि, १४.०१.२०२२ रोजी, सायंकाळी ५ वाजेपर्यंत, आधीच ३२ प्रवेश झाले होते. १४.०१.२०२२ च्या सकाळी ११.३० वाजताच्या प्रवेश यादीमध्ये ११११११११११, ६६६६६६६६६६ इत्यादी क्रमांक असलेल्या रुग्णांचे कोणतेही संपर्क तपशील नव्हते त्यामुळे ते रुग्ण खरे नसल्याचे स्पष्ट होते.”

११. वरील त्रुटी लक्षात घेऊन, उच्च न्यायालयाने ५० विद्यार्थ्यांना प्रवेशाची परवानगी मागे घेताना वैद्यकीय महाविद्यालयाला १०० विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरू ठेवण्यास परवानगी दिली. या आदेशाला या न्यायालयाने ८ एप्रिल २०२२ रोजी स्थगिती दिली. एकदा २०२१-२२ साठी वैद्यकीय महाविद्यालयाला १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिल्यानंतर, वैद्यकीय महाविद्यालय एकतर्फीपणे प्रवेश प्रक्रिया पुढे सुरु ठेवणे शक्य नव्हते. हे या न्यायालयाच्या निर्देशांचे सरळ उल्लंघन आहे. वैद्यकीय महाविद्यालयाने न्यायालयाच्या प्रक्रियेवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला आहे. या न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने केलेल्या त्यानंतरच्या तपासणीत वैद्यकीय महाविद्यालयाला कायदा गृहीत धरण्याचा अधिकार दिला नाही. यामुळे या न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाला आहे.

१२. तपासणीनंतर, वैद्यकीय महाविद्यालयास, १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची परवानगी देण्यात आली आणि त्यानुसार पुढील शैक्षणिक वर्षासाठी १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आल्याची सद्यस्थिती आहे.

१३. या न्यायालयाने दिलेल्या स्थगितीच्या आदेशाचे उल्लंघन करून २०२१-२२ साठी १०० विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रवेशाचा प्रश्न आता उरला आहे. वर, एकीकडे या टप्प्यावर विद्यार्थ्यांचे प्रवेश विस्कळीत झाल्यास काय परिणाम भोगावे लागतील, याचा न्यायालयाचे लक्ष आहे. त्याचप्रमाणे न्यायालयीन प्रक्रियेचे पावित्र्य ही पाळले पाहिजे. त्यामुळे, राज्यघटनेच्या अनुच्छेद १४२ अन्वये अधिकारक्षेत्राचा वापर करताना आमचे मत आहे की, २०२१-२२ मध्ये १०० विद्यार्थ्यांना देण्यात आलेले प्रवेश विस्कळीत होणार नाहीत या सशर्त अटीवर, वैद्यकीय महाविद्यालयाने चार आठवड्याच्या कालावधीत रु. २.५ कोटी एवढी रक्कम जमा करावी. ही रक्कम अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, नवी दिल्ली यांच्याकडे जमा केली जाईल आणि पुरावा म्हणून पावती अपीलकर्ते आणि या न्यायालयाच्या रजिस्ट्रीकडे सादर केली जाईल. हि रक्कम जमा झाल्यानंतर गरीब आणि गरजू रुग्णांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एम्सच्या संचालकांच्या मर्जीनुसार वापरली जाईल. वैद्यकीय महाविद्यालयाने दंडापोटी जमा करण्याचे निर्देश दिलेली रक्कम, चालू वर्षामध्ये किंवा त्यानंतर कोणत्याही प्रकारे विद्यार्थ्यांकडून वसूल केली जाणार नाही.

१४. विशेषत: महाराष्ट्र राज्याने सादर केलेल्या यादीनुसार केंद्रीय समुपदेशनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे हि वस्तुस्थिती लक्षात घेऊन, विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या संदर्भात अडथळा येत नाही.

१५. त्यानुसार लवाद याचिका निकाली काढण्यात आली आहे.

१६. प्रलंबित अर्ज, जर काही असतील, तर ते निकाली काढले जातील.

**........ भारताचे मुख्य न्यायमूर्ती**

**[डॉ. धनंजय य. चंद्रचूड]**

**............................न्यायमूर्ती**

**[पामिदीघंतम श्री नरसिंम्हा]**

**...........................न्यायमूर्ती**

**[जे. बी. पारडीवाला]**

**नवी दिल्ली,**

**१० फेब्रुवारी, २०२३.**

*************

**बाब क्रमांक ३२ न्यायालय क्र. १ विभाग IX**

**भारताचे सर्वोच्च न्यायालय**

**कार्यवाहीचे अभिलेख**

**विशेष अनुमती याचिका क्र. ५६२३/२०२२**

**(मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने ४-३-२०२२, रोजी रिट याचिका क्र. १२८०/२०२२ मध्ये दिलेल्या आक्षेपित अंतिम न्यायनिर्णयातून उद्भवलेले)**

**राष्ट्रीय वैद्यकीय आयोग आणि इतर. ... अपीलकर्ते**

**विरुद्ध**

**अण्णासाहेब चुडामण पाटील**

**मेमोरियल वैद्यकीय महाविद्यालय आणि इतर. ... उत्तरवादी**

**(सोबत- आक्षेपित न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत सादर करण्याची सूट मिळण्यासंदर्भात केलेला अं. अ. क्र. ४६८९८/२०२२ आणि सुनावणीच्या तारखांची मोठी यादी सादर करण्याच्या परवानगीसाठी केलेला अं. अ. क्र. ४६८९९/२०२२)**

**सोबत**

वि. अ. या. क्र. ६३४५/२०२२ (IX)

(सोबत- आक्षेपित न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत सादर करण्याची सूट मिळण्यासंदर्भात केलेला अं. अ. क्र. ५२२७०/२०२२ आणि अतिरिक्त कागदपत्रे/तथ्ये/जोडपत्रे सादर करण्याच्या परवानगीसाठी केलेला अं. अ. क्र. ५२२७१/२०२२)

दिनांक: १०-०२-२०२३, आज रोजी या याचिकांवर सुनावणी घेण्यात आली.

न्यायपीठ मा. मुख्य न्यायमूर्ती,

मा.न्यायमूर्ती श्री. पामिंदीघंतम श्री नरसिंम्हा

मा.न्यायमूर्ती श्री. जे. बी. पारडीवाला

याचिकाकर्त्यांच्या वतीने श्री. गौरव शर्मा, एओआर,

श्री. धवल मोहन, विधीज्ञ

श्री. प्रतीक भाटिया, विधीज्ञ

श्री. निषेध गुप्ता, ज्येष्ठ विधीज्ञ

श्री. अविजीत मनि त्रिपाठी, एओआर

श्रीम. प्रीती सेहरावत, विधीज्ञ

उत्तरवादींच्या वतीने श्री. निधेश गुप्ता, ज्येष्ठ विधीज्ञ

**श्री. अविजीत मनि त्रिपाठी, एओआर**

**श्रीम. प्रीती सेहरावत, विधीज्ञ**

**श्री. सिद्धार्थ धर्माधिकारी, विधीज्ञ**

**श्री. आदित्य अनिरुद्ध पांडे, एओआर**

**श्री. भारत बागला, विधीज्ञ**

**कु. कीर्ती दाढीच, विधीज्ञ**

**विधिज्ञांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने पुढील आदेश दिले.**

१. अनुमती दिली.

२. स्वाक्षरी केलेल्या प्रकाशनयोग्य न्यायनिर्णयाद्वारे अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

३. प्रलंबित अर्ज, जर काही असतील, तर ते निकाली काढले जातील.

(संजय कुमार- I) (सरोज कुमारी गौर)

उप प्रबंधक (सहायक प्रबंधक)

(स्वाक्षरी केलेला प्रकाशनयोग्य न्यायनिर्णय फाइलवर ठेवला आहे.)

**********

## <u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मात्रभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.